**महाराष्ट्र शासन**
विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,३ मजला, प्रशासकीय इमारत,रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई - ४०००७१.
e-mail - **eislbnlift.nrg-mh@gov.in** दूरध्वनी क्रमांक – **०२२-२५२८५९६७**

## विद्युत पर्यवेक्षक व तारतंत्री यांच्या माहे नोव्हेंबर-२०२३ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षा

**विद्युत पर्यवेक्षक लेखी परीक्षा दि.२५/११/२०२३ रोजी व तोंडी परीक्षा दि.२६/११/२०२३** रोजी मुंबई/पुणे/औरंगाबाद व नागपूर या ठिकाणच्या केंद्रातुन घेण्यात येतील. तसेच **तारतंत्री परीक्षा दि.२९/११/२०२३ पासुन मुंबई/पुणे/ कोल्हापुर/औरंगाबाद / नाशिक / नागपुर व अमरावती** या केंद्रातुन घेण्यात येतील. दोन्ही परिक्षेकरीता अर्ज नमुना " १२ म ", " सी " व " ई " यामध्ये तसेच दोन्ही परिक्षेच्या पुनःप्रवेशाकरीता अर्ज नमुना " १२ म " व " डी " यामध्ये सुवाच्छ अक्षरात/ टंकलिखित पूर्ण भरुन संबंधित जिल्हयाचे विद्युत निरीक्षक किंवा विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ) यांचेकडे सादर करावेत. अर्ज सादर करणे, अर्ज मंजूर/ नामंजूर यादी जाहीर करावयाचा दिनांक, त्रुटी पूर्तता करावयाचा अंतिम दिनांक व इतर बाबी खाली दर्शविल्या प्रमाणे आहेत. मंजूर/ नामंजूर/त्रुटी अर्जाची यादी संबंधित अधीक्षक अभियंता/विद्युत निरीक्षक किंवा विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ) कार्यालयात खाली नमुद केलेल्या दिनांकानुसार पाहावयास मिळेल. खाली नमुद करण्यात आलेल्या परीक्षा शुल्काचा भरणा शासनाच्या **GRAS** प्रणाली व्दारे ऑनलाईन पध्दतीने किंवा बँकेत चलनाव्दारे भरणा करुन त्याची मुळ पावती अर्जासोबत जोडावी. उमेदवारांनी अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेली खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. परीक्षेकरीता आवश्यक फॉर्म **www.ceimah.in** या संकेतस्थळावर किंवा संबंधीत विद्युत निरीक्षक कार्यालयात उपलब्ध आहेत.

तारतंत्री परीक्षा

१) महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificat)
२) अनुभवाचा पुरावा किंवा विद्युत कंत्राटदाराच्या हजेरीपटाची प्रत ( नुतनीकरण केलेली प्रत)
३) निवासी पुरावा ( पासपोर्ट / आधार कार्ड / वोटींग कार्ड यापैकी कोणतेही एक)
४) ३ रंगीत पासपोर्ट (२ * २ ) इंच आकाराचे अलीकडच्या काळातील फोटो
५) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.५/- चा स्टॅम्प लावलेले २८ से.मी. x १२ से.मी आकाराचे दोन लिफाफे
६) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.४५/- चा स्टॅम्प लावलेले ४० से.मी. x २९ से.मी आकाराचा एक लिफाफा

विद्युत पर्यवेक्षक परीक्षा

वरील यादीतील अनुक्रमांक १ ते ६ व्यतिरीक्त खालील कागदपत्रे जोडावीत.

७) तारतंत्री परवाना व प्रमाणपत्राची छायाप्रत
८) एसएससी मार्कलिस्ट / प्रमाणपत्र
९) विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका याखेरीज इतर शाखेमध्ये पदवी / पदविका प्राप्त उमेदवारांकरीता-
अ) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या विद्यापिठाची / मंडळाची / संस्थेची पदवी / पदविका
ब) वरील परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्युत अभियांत्रिकीच्या क्षेत्रातील किमान एक वर्षाचा प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र

### पर्यवेक्षक परिक्षेकरीता

| अ.क्र. | विषय | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज वितरण | ०६/०९/२०२३ पासुन |
| २ | पूर्ण भरलेला अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख | १३/१०/२०२३ |
| ३ | अर्ज मंजूर/ नामंजूर/ त्रुटीची यादी मंडळ व विभागीय कार्यालयात प्रसिध्द करावयाचा दिनांक | १७/१०/२०२३ |
| ४ | अर्जामध्ये त्रुटी असल्यास पुर्तता करावयाचा अंतिम दिनांक सर्व केंद्राकरीता | २३/१०/२०२३ |
| ५ | परीक्षा दिनांक ( सर्व केंद्राकरीता ) | |
| | लेखी परीक्षा (Written) | २५/११/२०२३ |
| | तोंडी परीक्षा (Oral) | २६/११/२०२३ |
| ६ | परीक्षा शुल्क | रु.५००/- |

### तारतंत्री परिक्षेकरीता

| अ.क्र. | विषय | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज वितरण | ०६/०९/२०२३ पासुन |
| २ | पूर्ण भरलेला अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख | १६/१०/२०२३ |
| ३ | अर्ज मंजूर/नामंजूर/ त्रुटीची यादी जिल्हा व विभागीय कार्यालयात प्रसिध्द करावयाचा दिनांक | १८/१०/२०२३ |
| ४ | अर्जामध्ये त्रुटी असल्यास पूर्तता करावयाचा अंतिम दिनांक सर्व केंद्राकरीता | २६/१०/२०२३ |
| ५ | परीक्षा दिनांक(मुंबई/ पुणे/ कोल्हापुर/ औरंगाबाद/ नाशिक/ नागपुर व अमरावती केंद्रा करीता) | २९/११/२०२३ पासुन |
| ६ | परीक्षा शुल्क | रु.५००/- |

वर उल्लेखित करण्यात आलेल्या त्रुटीच्या पूर्तता दिनांका नंतर त्रुटी असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मंडळ कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज मंजूर / नामंजूर करण्याचे सर्व अधिकार संबंधित अधीक्षक अभियंता किंवा विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ) यांनी राखुन ठेवलेले आहेत. परिक्षेचे अर्ज दि. **०६/०९/२०२३** पासुन संबंधित विद्युत निरीक्षक कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. विद्युत पर्यवेक्षक परीक्षा फक्त मराठी/हिंदी/इंग्रजी या भाषांतुन घेण्यात येतील. **इतर तपशीलासाठी विद्युत निरीक्षक ( सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक) मुंबई अथवा अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच जिल्हयाचे संबंधित विद्युत निरीक्षक यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.**

(अभिजीत ल.कस्तुरे)
विद्युत निरीक्षक
(सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाह